जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १७४ | गुरुवार, १५ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure. Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

# पुणे महानगरपालिकेसाठी आज मतदान तर उद्या निकाल

## पोलीस प्रशासन आणि निवडणूक यंत्रणा 'अलर्ट मोड'वर


**संतोष मुंडे/अश्लेषा मस्के**

पुणे ता. १४ : राज्यातील बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित पुणे महापालिकेसाठी आज (१५ जानेवारी) मतदान प्रक्रिया पार पडणार असून सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत पुणेकरांना मतदान करता येणार आहे. मतमोजणी शुक्रवारी (१६ जानेवारी) रोजी होणार आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने पुणे शहरावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी सत्ताधारी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यातच मुख्य लढत रंगणार असल्याचे दिसून येत आहे. यासाठी महापालिका आणि पोलीस प्रशासनही सज्ज झाले आहे.

यावेळी महापालिकेचे १६५ नगरसेवक निवडणूकीच्या रिंगणात होते. मात्र, यातील दोन जागा बिनविरोध झाल्याने १६३ नगरसेवकांच्या निवडीसाठी मतदान होणार आहे. आज पुण्यातील सुमारे ३५ लाख मतदार आपल्या प्रभागांचे प्रतिनिधी निवडणार असून, मतदार राजा आपले मत कुणाच्या पारड्यात टाकतो याकडे पुणेकरांचे लक्ष लागुण आहे.

पुणे महापालिका हद्दीत एकूण ४,०११ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया राबवली जाणार आहे. येथे ३५ लाख १,८५४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यासाठी मतदान केंद्रांची पाहणी, नियोजन आणि कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आदी सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे. आजच्या मतदान प्रक्रियेसाठी २५,८९९ कर्मचारी, ४५४ क्षेत्रीय अधिकारी, ३२ नोडल अधिकारी, २,४०० नोडल अधिनस्त कर्मचारी तसेच सुमारे १,२०० आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मतमोजणीसाठी १,०६२ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. यंदाच्या निवडणुकीत उमेदवारांनी सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर केल्याचे दिसून येत आहे. थेट मतदारांपर्यंत पोहोचण्यात मर्यादा येत असताना सोशल



मीडियाच्या माध्यमातून प्रचारावर उमेदवारांनी भर दिल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, पुणे महापालिका निवडणुकांसाठी प्रशासनासह पुणे पोलिसही पूर्णपणे सज्ज झाले आहेत. निवडणूक शांततेत पार पडावी यासाठी १२ हजारांहून अधिक पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. वरिष्ठ अधिकारी ते पोलिस अंमलदार असा मोठा फौजफाटा रस्त्यावर तैनात असणार आहे.

शहरात चारस्तरीय सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली असून प्रत्येक बुथवर पोलिस अंमलदार, होमगार्ड आणि स्थानिक पोलिसांचा बंदोबस्त असेल. गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांचे पथक कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सतर्क राहणार आहे. कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी विभागून घेण्यासाठी शहरात ४५४ झोन करण्यात आले असून त्या-त्या भागात वरिष्ठ निरीक्षक व सहाय्यक आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली पेट्रोलिंग केले जाणार आहे.

> आज होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी संपूर्ण तयारी करण्यात आली आहे. संवेदनशील तसेच महत्त्वाच्या मतदान केंद्रांवर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे.
> **- पोलिस आयुक्त अमितेश कुमार**

शहरातील ३,९८३ बुथ केंद्रांवर मतदान होणार असून ९१३ इमारतींमध्ये ही प्रक्रिया पार पडेल. ९० संवेदनशील मतदान केंद्रांवर अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. आठ क्यूआरटी पथके, चार एसआरपीएफ कंपन्या, मोबाइल पेट्रोलिंग पथकेतसेच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचे स्ट्रायकिंग फोर्स सतर्क ठेवण्यात आले आहेत.

समाज माध्यमावरील प्रचारावरही निवडणूक प्रशासन आणि पोलिस यंत्रणा बारकाईने नजर ठेवून आहे. एकूणच, पुणे महानगरपालिका निवडणूक पारदर्शक, शांततापूर्ण आणि सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासन व पोलिस यंत्रणा सज्ज झाली असून आजचा मतदानाचा दिवस शहराच्या राजकीय भवितव्याच्या दृष्टीने निर्णायक ठरणार आहे.

**मतदार ओळखीसाठी ग्राह्य कागदपत्रे**

मतदानाच्या वेळी मतदार ओळखपत्रासह पुढील कागदपत्रे ओळख म्हणून ग्राह्य धरली जाणार आहेत.भारतीय पासपोर्ट, आधार कार्ड, वाहनचालक परवाना, आयकर विभागाचे ओळखपत्र, केंद्र किंवा राज्य शासनाने दिलेले फोटो ओळखपत्र, बँक अथवा पोस्ट ऑफिसचे फोटो असलेले पासबुक, अपंगत्व प्रमाणपत्र, मनरेगा फोटो ओळखपत्र, निवृत्ती वेतनविषयक कागदपत्रे, लोकसभा किंवा विधानसभेचे अधिकृत ओळखपत्र, स्वातंत्र्यसैनिक ओळखपत्र तसेच केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा कार्ड हे ओळखपत्र घेऊन मतदारांनी आपले मत करण्यासाठी मतदान केंद्रावर जावे.

## संक्षिप्त

### टीईटीची अंतिम उत्तरसूची जाहीर

**पुणे, ता. १४ :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेची (टीईटी) अंतिम उत्तरसूची प्रसिद्ध करण्यात आली आहे. अंतरिम उत्तरसूची प्रसिद्ध झाल्याने आता निकाल कधी जाहीर होणार, याकडे उमेदवारांचे लक्ष लागले आहे. परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे या बाबतची माहिती दिली. परीक्षा परिषदेतर्फे२३ नोव्हेंबर २०२५ रोजी टीईटी परीक्षा घेण्यात आली. परीक्षेची अंतरिम उत्तरसूची १९ डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. या परीक्षेच्या पेपर क्रमांक १ आणि २ च्या प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा पर्यायी उत्तरांसंदर्भातील त्रुटी, आक्षेप २७ डिसेंबर पर्यंत मागवण्यात आले होते. दिलेल्या मुदतीत प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेवून अंतिम उत्तरसूची प्रसिद्ध करण्यात आली आहे. आता या अंतिम उत्तरसूचीबाबत कोणतेही निवेदन, आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत. अंतिम उत्तरसूचीनुसार परीक्षेचा निकाल यथावकाश परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. याचीही संबंधित परीक्षार्थीनी नोंद घ्यावी, असेही ओक यांनी स्पष्ट केले.

## बेकायदेशीर वाळू वाहतुकीला विरोध केल्याने शेतकरी कुटुंबावर हल्ला


**न्हावरे, ता. १४ :** शिरूर तालुक्याच्या पूर्व भागातील चिंचणीलगडवाडी परिसरात वाळू माफियांची दहशत पुन्हा एकदा उघडकीस आली असून, बेकायदेशीर वाळू वाहतुकीला विरोध केल्याच्या रागातून एका शेतकऱ्यासह त्याच्या कुटुंबीयांवर अमानुष हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेत सहा महिन्यांची गरोदर महिला, वृद्ध आईसह चौघे जखमी झाले आहेत. लक्ष्मण मारुती कोळपे (वय-३९,रा. चिंचणी, ता. शिरूर, जि. पुणे) हे शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या शेतातील गट क्रमांक-८०८१ मधून घोडनदी पात्रातून उपसलेली बेकायदेशीर वाळू हायवाने वाहून नेली जात होती. यामुळे शेताचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत होते. या बेकायदेशीर वाहतुकीला कोळपे यांनी विरोध केला होता. याचाच राग मनात धरून वाळू तस्करांनी थेट शेतकऱ्यावरच हल्ला चढवला.

मंगळवारी (ता. १३) रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास विजय पवार, अजय धावडे, बाबू जेऊघाले, विशाल पवार व अन्य ५ ते ६ जण इर्टिगा कार व मोटारसायकलवरून लगडवाडी येथील कोळपे यांच्या घरासमोर आले. तुला फार माज आला आहे का? आमची वाळूची गाडी अडवणार का? अशी धमकी देत अजय धावडे याने काठीने लक्ष्मण कोळपे यांना बेदम मारहाण केली.

## सोशल मिडीयावरून दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या तिघांची येरवडा कारागृहात रवानगी

**दौंड, ता. १४ :** इंस्टाग्राम वरून आक्षेपार्ह व्हिडीओ व मजकूर पोस्ट करून दोन समाजांत तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन युवकांना येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

खुशीलाल घनशाम सहाणी (वय २१) व राजेश प्यारेलाल सहाणी (वय ३५) दोघे मूळ रा. तेलीयाडीया, पो. तेलपुरखा, जि. सिद्धार्थनगर (उत्तर प्रदेश), सध्या रा. देऊळगाव राजे (ता. दौंड, जि. पुणे) व मीर हसन मोहम्मद मक्सुदमिया अली (वय २८), रा. भगवानपूर, जि. कैमूर (बिहार) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या तिघांनी त्यांच्या इंस्टाग्राम सोशल मीडियाअकाउंटवरून दोन जाती-धर्मांत तेढ निर्माण होईल, असा आक्षेपार्ह मजकूर व व्हिडीओ पोस्ट केल्याचे निष्पन्न झाले. या कृत्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच सामाजिक शांतता अबाधित राहावी, यासाठी पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत आरोपींना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बारामती विभाग, बारामती यांच्यासमोर हजर करण्यात आले. सुनावणीनंतर तिघांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी मंजूर करून येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली.

दरम्यान, सोशल मीडियावर समाजात तेढ निर्माण करणारे, द्वेष पसरवणारे किंवा आक्षेपार्ह मजकूर पोस्ट करणाऱ्यांविरोधात कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

## काळेवाडीत भरधाव ट्रकची दुचाकीला धडक; दोन सख्ख्या बहिणींचा जागीच मृत्यू

**पिंपरी, ता. १४ :** मकर संक्रांतीसारख्या सणाच्या दिवशी काळेवाडी परिसरात काळाने घाला घातला. भरधाव ट्रकने दुचाकीला दिलेल्या भीषण धडक्त दोन सख्ख्या बहिणींचा दुर्दैवी अंत झाला. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून शिंदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

ही भीषण घटना बुधवारी दुपारी काळेवाडी येथील धनगर बाबा मंदिरासमोरील पेट्रोल पंपाजवळ घडली. ऋतुजा पांडुरंग शिंदे (वय -२४) आणि नेहा पांडुरंग शिंदे (वय -२०, रा. पुनावळे) अशी मृत बहिणींची नावे आहेत. अपघातानंतर दोघींनाही गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी



त्यांना मृत घोषित केले.

काळेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र बहिरट यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुनावळे येथील शिंदे कुटुंबाचा मिरची कांडपचा व्यवसाय आहे. ऋतुजा आणि नेहा या कुटुंबातील दोनच मुली होत्या. ऋतुजाने एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले होते, तर नेहा महाविद्यालयीन शिक्षण घेत होती. बुधवारी दोघी बहिणी काही कामानिमित्त दुचाकीवरून जात असताना काळेवाडी येथे भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

धडकेचा जोर इतका भीषण होता की दोघी बहिणी रस्त्यावर फेकल्या गेल्या आणि गंभीर जखमी झाल्या. अपघाताची माहिती मिळताच काळेवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत ट्रकचालक जितेंद्र निराले (रा. खलघाट, जि. धार, मध्यप्रदेश) याला तात्काळ ताब्यात घेतले.

दरम्यान, संक्रांतीच्या दिवशीच दोन तरुण मुलींचा असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने पुनावळे व काळेवाडी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. आनंदाचा सण शिंदे कुटुंबासाठी आयुष्यभर न भरून येणाऱ्या दुःखात बदलला असून, या अपघाताने पुन्हा एकदा भरधाव वाहनांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## पुणे–दिल्ली प्रवास सुपरफास्ट होणार

**पुणे, ता. १४ :** पुणे आणि दौंड दरम्यान रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी दिलासादायक बातमी आहे. दौंड कॉर्ड लाईनवरील दुसऱ्या प्लॅटफॉर्मचे काम अंतिम टप्प्यात आले असून लवकरच तो प्रवाशांसाठी खुला होणार आहे. या कामामुळे पुणे, मनमाड, दिल्ली आणि हावडा मार्गावरील रेल्वे प्रवास अधिक जलद आणि सोयीचा होणार आहे. दररोज या मार्गावरून हजारो प्रवासी प्रवास करतात. त्यांना आता वेळेची बचत होणार आहे.

सध्या दौंड कॉर्ड लाईनवर केवळ एकच प्लॅटफॉर्म कार्यरत आहे. त्यामुळे मनमाडकडून पुण्याकडे येणाऱ्या किंवा पुण्याकडून उत्तरेकडे जाणाऱ्या गाड्यांना अनेक वेळा क्रॉसिंगसाठी थांबावे लागत होते. यामुळे प्रवासाचा वेळ वाढत होता आणि प्रवाशांना उशीर सहन करावा लागत होता. दुसरा प्लॅटफॉर्म सुरू झाल्यानंतर ही अडचण दूर होणार आहे. गाड्यांना थांबण्याची गरज कमी



होईल आणि प्रवासाचा वेळ किमान १५ ते २० मिनिटांनी कमी होईल, अशी माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

दौंड कॉर्ड लाईनला विशेष महत्त्व आहे. २०२० मध्ये ही लाईन सुरू झाल्यानंतर अनेक गाड्यांना दौंड जंक्शनवर जाऊन इंजिन बदलण्याची गरज उरली नाही. त्यामुळे प्रवास सोपा झाला. मात्र, एकाच प्लॅटफॉर्ममुळे निर्माण होणारी कोंडी ही मोठी समस्या होती. आता दौंड ते काष्टी दरम्यानचे दुहेरीकरण जवळपास पूर्ण होत असून, नवीन प्लॅटफॉर्ममुळे ही समस्या कायमची सुटणार आहे.

रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून येत्या १५ दिवसांत या मार्गाची आणि नवीन प्लॅटफॉर्मची तपासणी केली जाणार आहे. मंजुरी मिळाल्यानंतर हा प्लॅटफॉर्म प्रवाशांसाठी सुरू करण्यात येईल. सुरुवातीला गाड्यांची थांबे व्यवस्था करण्यात येईल. त्यानंतर छत, पादचारी पूल आणि इतर सोयीसुविधांची कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जातील, अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे. या निर्णयामुळे प्रवाशांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## दौंड शहरातील सुशोभीकरणासाठी २ एकर शासकीय जागा मंजूर

### आमदार राहुल कुल यांच्या पाठपुराव्याला यश

**दौंड, ता. १४ :** दौंड शहरातील नागरिकांच्या सुविधेसाठी आणि शहराच्या वैभवात भर टाकण्यासाठी आमदार राहुल कुल यांनी केलेल्या विशेष पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. दौंड येथील गायरान जमिनीपैकी गट नं. २७६/१ अ मधील तब्बल ८ हजार चौरस मीटर (२ एकर) जागा बगीचा आणि सुशोभीकरण विकसित करण्यासाठी दौंड नगरपरिषदेला देण्याचा शासन निर्णय महसूल व वन विभागाने निर्गमित केला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने १३ जानेवारी २०२६ रोजी काढलेल्या आदेशानुसार, दौंड नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना ही जागा विनामूल्य (महसूल



मुक्त आणि भोगवटा मूल्यरहित) प्रदान करण्यात आली आहे. या जमिनीचा वापर केवळ सार्वजनिक प्रयोजनासाठी म्हणजेच सुशोभीकरण करण्यासाठीच बंधनकारक करण्यात आला आहे.

वाढत्या शहरीकरणामुळे दौंड शहरात मोठ्या मोकळ्या जागेची आणि उद्यानाची गरज भासत होती. आमदार राहुल कुल यांनी ही गरज ओळखून शासनाकडे या जागेची मागणी केली होती. आता २ एकरची ही जागा मिळाल्यामुळे तिथे वृक्षारोपण करून शहराचे सौंदर्यीकरण केले जाणार आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांसाठी हे एक हक्काचे विरंगुळा केंद्र ठरणार आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल समाधान व्यक्त करताना आमदार राहुल कुल म्हणाले की, दौंड शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे. ही जागा मंजूर केल्याबद्दल मी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा अत्यंत ऋणी आहे. त्यांच्या सहकार्यामुळेच दौंडच्या विकासातील हा एक मोठा टप्पा पूर्ण झाला आहे. या निर्णयामुळे संपूर्ण दौंड शहरात आनंदाचे वातावरण असून, शहराच्या वैभवात भर पडणार असल्याच्या भावना नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत.

**प्रमुख वैशिष्ट्ये**

क्षेत्रफळ:८,०००चौ.मी.(२ एकर). उद्देश : सार्वजनिक आणि शहराचे सुशोभीकरण.नियोजन : आधुनिक लँडस्केपिंग आणि पर्यावरण संवर्धन. कालमर्यादा : जागा ताब्यात मिळाल्यापासून ३ वर्षांच्या आत या प्रकल्पाचे काम सुरू करणे बंधनकारक.

## राजकोटमध्ये केएल राहुलचा शतकी धमाका

**राजकोट, ता. १४ :** न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात केएल राहुलने अवघ्या ८७ चेंडूत झंझावाती शतक झळकावले. ९ चौकार आणि १ षटकारासह त्याने नाबाद ११२ धावांची खेळी केली. यासह राजकोटच्या निरंजन शाह स्टेडियम वर वनडे शतक ठोकणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरलाय.

या शतकासह राहुलने माजी कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन यांचा ७ शतकांचा विक्रम मागे टाकला. राहुलच्या नावावर आता ९३ सामन्यांत ८ वनडे शतके आहेत. तब्बल दोन वर्षांनंतर राहुलने शतकाचा दुष्काळ संपवला असून, गेल्या ४ डावांतील त्याची ही तिसरी ५० पेक्षा जास्त धावसंख्या आहे. शतक पूर्ण केल्यावर त्याने आपल्या लेकीसाठी केलेले अनोखे सेलिब्रेशन सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरतोय.

## संक्षिप्त

### निवडणुकीनंतर भाजप, राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येतील : सुनील तटकरे



**रायगड, ता. १४ :** निवडणूकपूर्व युती आणि निवडणुकोत्तर युती या संकल्पना आहेत. आता एकहाती सत्ता येण्याचे दिवस संपले आहेत. त्यामुळे निवडणुकीचे निकाल काय लागतात यावर पुढील निर्णय घेतला जाईल, असे सांगत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी भाजपबरोबर युतीचे संकेत दिले. निवडणुकीनंतर भाजप-राष्ट्रवादी एकत्र येण्यावर तटकरे म्हणाले, आताच्या काळात एकहाती सत्ता येण्याचे दिवस संपले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसला अपेक्षेपेक्षा जास्त जागा मिळतील. निवडणूकपूर्व युती आणि निवडणुकोत्तर युती या संकल्पना आहेत. पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये अर्ज भरताना असलेले वातावरण आता पूर्ण बदलले आहे. त्यामुळे निवडणुकीचे निकाल काय लागतात यावर पुढील निर्णय घेतला जाईल. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणावर ते म्हणाले, हा प्रश्न मोठा आहे. काळाच्या ओघात त्याबाबत निर्णय घेतला जाईल. विलीनीकरणाचा निर्णय शरद पवार यांच्या पक्षाने घ्यावा.

### होळकर पुलावर वाहनाच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**पिंपरी, ता. १४ :** खडकीतील होळकर पुलावर भरधाव वाहनाच्या धडकेत एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या महिलेची ओळख पटलेली नाही. मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे वय अंदाजे ५५ ते ६० वर्ष आहे. याबाबत पोलीस कर्मचारी वैणुनाथ तिखे यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी (१३जानेवारी) सकाळी साडेसहाच्या सुमारास खडकीतील होळकर पूलाकडून विश्रांतवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक महिला जखमी अवस्थेत पडल्याची माहिती विश्रांतवाडी पोलिसांना मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. गंभीर जखमी झालेल्या महिलेला रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, उपचारांपूर्वीच तिचा मृत्यू झाला होता. भरधाव वाहनाच्या धडकेत महिलेचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. पसार झालेल्या वाहनचालकाचा शोध घेण्यात येत असून, पोलीस उपनिरीक्षक शेख तपास करत आहेत.

### अंमली पदार्थांच्या तस्करी करणाऱ्या जेष्ठ नागरिकाला अटक

**पिंपरी चिंचवड, ता. १४ :** पिंपरी चिंचवडमध्ये अंमली पदार्थांच्या तस्करीचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी केलेल्या कारवाईत एका ६७ वर्षांच्या वृद्धाला अटक करण्यात आली आहे. भाटनगर भागात गांजाची विक्री होत असल्याची गुप्त बातमी अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या प्रकरणी पोलिसांनी ताराचंद मलकेकर नावाच्या ज्येष्ठ नागरिकासह एका महिलेवर गुन्हा नोंदवला आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने रचलेल्या सापळ्यात हा अवैध व्यवहार समोर आला. सोमवारी १२ जानेवारी रोजी दुपारी १२:३० च्या सुमारास पोलीस कर्मचारी कपिलेश इगवे यांना मिळालेल्या माहितीवरून ही कारवाई पार पडली. पोलिसांनी संशयिताची तपासणी केली असता त्याच्याकडे १०० ग्रॅम गांजाची पाकिटे आढळून आली. जप्त केलेल्या या अमली पदार्थाचे मूल्य बाजारात ५००० रुपये इतकेआहे. पोलिसांनी या मालासह इतर साहित्य आपल्या ताब्यात घेतले असून तपासात एका महिलेचा सहभाग देखील समोर आला आहे. पिंपरी पोलीस आता या साखळीचा मुख्य सूत्रधार कोण आहे, याचा शोध घेत आहेत.

### ‘मर्दानी ३’ मधील खलनायिकेची सोशल मीडियावर चर्चा

**पुणे, ता. १४ :** यशराज फिल्म्सच्या गाजलेल्या मर्दानी या चित्रपटाचा तिसरा भाग लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून १२ जानेवारी रोजी त्याचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. या सिनेमात राणी मुखर्जी पुन्हा एकदा शिवानी शिवाजी रॉय या कणखर पोलीस ऑफिसरच्या भूमिकेत दिसणार आहे. सध्या इंटरनेटवर या ट्रेलरची प्रचंड चर्चा आहे, पण यावेळी राणीसोबतच चित्रपटातील महिला खलनायिकेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या सिनेमात खलनायिका एका मानवी तस्करी करणाऱ्या टोळीच्या आणि बेगर माफियांची प्रमुख म्हणून दिसत आहेत. ट्रेलरमध्ये त्यांचा अभिनय अतिशय भीतीदायक वाटतो. या भागात शिवानी रॉयचा सामना अम्मा नावाच्या एका अतिशय निर्दयी महिलेशी होणार आहे. ही क्रूर भूमिका कोणत्या अभिनेत्रीने केली आहे, याबाबत चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे.

# काहीही आक्षेपार्ह सापडलं नाही : उपमुख्यमंत्री अजित पवार



**पुणे, ता. १४ :** पुणे महापालिका निवडणुकीचा प्रचार संपल्यानंतर अवघ्या काही तासांतच उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांच्याशी संबंधित डिझाइनबॉक्स्ड या संस्थेच्या कार्यालयात पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेचे अधिकारी दाखल झाल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. निवडणुकीच्या तोंडावर झालेल्या या घडामोडीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या असून, या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी स्वतः स्पष्टीकरण दिले आहे.

गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी मंगळवारी पुण्यातील डिझाइनबॉक्स्डच्या कार्यालयात भेट देत काही माहिती घेण्याचा प्रयत्न केला. या पाहणीदरम्यान आवश्यक कागदपत्रे आणि माहिती अधिकाऱ्यांना देण्यात आली. मात्र प्रचार थांबताच अजित पवार यांच्या निकटवर्तीय सल्लागाराच्या कार्यालयात पोलिस पोहोचल्यामुळे राजकीय वातावरण अधिक तापले.

सध्या पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. अजित पवार यांनी अलीकडेच भाजपवर भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून जोरदार हल्लाबोल केला होता. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी राजकीय आरोप-प्रत्यारोप शिगेला पोहोचले होते. त्यानंतर लगेचच गुन्हे शाखेचे अधिकारी त्यांच्या सल्लागाराच्या कार्यालयात दाखल झाल्यामुळे अनेक तर्कवितर्कांना उधाण आले.

नरेश अरोरा हे अजित पवार यांचे प्रमुख राजकीय सल्लागार म्हणून ओळखले जातात. डिझाइनबॉक्स्ड ही संस्था राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचार मोहिमेचे नियोजन, सभा आयोजन, जनसंपर्क आणि राजकीय रणनीती आखण्याचे काम पाहते. लोकसभा निवडणुकीपासून ते महापालिका निवडणुकीपर्यंत ही संस्था अजित पवार यांच्या राजकीय मोहिमेत सक्रिय आहे.

या संपूर्ण प्रकारावर अजित पवार यांनी प्रतिक्रिया देत स्पष्ट केले की, गुन्हे शाखेचे अधिकारी केवळ माहिती घेण्यासाठी कार्यालयात आले होते. त्यांनी सांगितले की, नरेश अरोरा आणि डिझाइनबॉक्स्डच्या पुणे कार्यालयात क्राईम ब्रँचचे अधिकारी माहिती घेण्याच्या उद्देशाने आले होते. आवश्यक ती सर्व माहिती देण्यात आली असून पूर्ण सहकार्य करण्यात आले आहे. या प्रक्रियेत कोणतीही आक्षेपार्ह बाब किंवा अनियमितता आढळलेली नाही.

निवडणुकीच्या काळात प्रशासनाच्या प्रत्येक हालचालीकडे राजकीय नजरेतून पाहिले जाते. त्यामुळे या भेटीला राजकीय रंग दिला जात असला तरी अजित पवार यांच्या स्पष्टीकरणानंतर या प्रकरणावर पडदा पडण्याची शक्यता आहे. मात्र मतदानाच्या उंबरठ्यावर झालेली ही घडामोड पुण्यातील राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे.

### कृषी केंद्रात चोरी; ८ लाखांच्या मुद्देमालासह दोघांना अटक

**पुणे, ता, १४ :** पुणे जिल्ह्यातील मंचर पोलिसांनी पेठ परिसरात एका कृषी केंद्रावर चोरी करणाऱ्या २ अट्टल चोरट्यांना मोठ्या शिताफीने अटक केली आहे.पेठ येथील सह्याद्री कृषी उद्योग या दुकानाचे शटर उचकटून चोरट्यांनी रात्रीच्या वेळी आत प्रवेश केला होता. किरण कैलास कुंदळे यांचे हे दुकान असून दुकानातून चोरट्यांनी सुमारे ३ लाख ११ हजार २०५ रुपये किमतीचे बियाणे आणि औषधे चोरून नेली होती, ज्याची तक्रार मंचर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती.

या कारवाईमध्ये पोलिसांनी चोरीला गेलेली खते, कीटकनाशके आणि गुन्ह्यात वापरलेली कार असा मिळून एकूण ८ लाख ११ हजार २०५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोलिसांचे शोध पथक या चोरीचा तपास करत असताना त्यांना एका गोपनीय बातमीदाराकडून महत्त्वाची माहिती मिळाली.

# लोणी काळभोर येथील भांडणात एकाच्या तोंडावर मारला सिमेंटचा गट्टू



**लोणी काळभोर, ता. १४ :** धक्का दिल्याने नीट बघून चाल म्हणाल्याचा राग मनात धरून दोघांनी शिवीगाळ करून एकाच्या तोंडावर सिमेंटचा गट्टू मारल्याची घटना घडली आहे. ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील अमित बिर्याणी हॉटेल मध्ये मंगळवारी (ता.१३) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या मारहाणीत एकजण गंभीर जखमी झाला आहे. तर दोघांच्या विरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परमेश्वर काशिनाथ बिराजदार (वय ५५ रा. हाडके पेट्रोल पंपाच्या समोर, लोणी स्टेशन, कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे) असे जखमी झालेल्याचे नाव असून त्यांच्यावर पुण्यातील ससून रुग्णालयात उपचार सुरु आहेत. तर प्रेम्या व एका २० वर्षीय अनोळखी इसमाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी परमेश्वर बिराजदार व त्यांचा भाडेकरु गिरुलिंगप्पा हे दोघेजण अमित बिर्याणी हॉटेलमध्ये जेवण करण्यासाठी गेले होते. बिराजदार हे हॉटेलमध्ये हात धुन्यासाठी बेसीनकडे जात असताना, हॉटेलमध्ये समोरच बसलेल्या दोन इसमांनी त्यांना धक्का दिला. तेव्हा बिराजदार म्हणाले, निट बघुन चला. दरम्यान, निट बघुन चला असे म्हणाल्याचा राग मनात धरून आरोपी प्रेम्या व पांढरा शर्ट घातलेल्या एका अनोळखी इसम इसमाने फिर्यादी परमेश्वर बिराजदार यांना शिवीगाळ करत हॉटेलचे बाहेर गेले. तेव्हा बिराजदार हे सदर इसम कोठे गेले? हे पाहण्यासाठी हॉटेलच्या बाहेर आले. तेवढ्यात प्रेम्या नाव असलेल्या इसमाने सिमेंटचा गट्टू उचलून परमेश्वर बिराजदार यांच्या तोंडावर मारला. आणि दोन्ही आरोपी घटनास्थळावरून पळून गेले.

या मारहाणीत परमेश्वर बिराजदार हे गंभीर जखमी झाले आहे. त्यांच्यावर पुण्यातील ससून रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे. बिराजदार यांनी याप्रकरणी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोन्ही आरोपींच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८ (२), ३५२, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पूढील तपास लोणी काळभोर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अनिल जाधव करत आहेत.

## निवडणुकीच्या रणधुमाळीत मुख्यमंत्री फडणवीसांनी केला रेकॉर्ड ब्रेक प्रचार

**पुणे, ता. १४ :** राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी सुरू असलेला प्रचाराचा धुरळा आता अखेर खाली बसला आहे. गेल्या १४ दिवसांपासून सुरू असलेल्या या धावपळीत सर्वच पक्षांनी आपली पूर्ण शक्ती लावली होती. यामध्ये सत्ताधारी महायुतीची बाजू सावरण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण राज्यात प्रचार केला. आता प्रचाराची मुदत संपल्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्याची आकडेवारी समोर आली असून त्यांनी सभा आणि संवादाचा एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वाधिक ७ सभा त्यांनी मुंबईत घेतल्या, तर नागपूरमध्ये ५ आणि पुण्यात २ सभांच्या माध्यमातून त्यांनी जनतेला संबोधित केले. या काळात एकूण ७७ मोठे कार्यक्रम केले. यात ३७ मोठ्या जाहीर सभांचा समावेश होता. याशिवाय नाशिक, सोलापूर, लातूर, अकोला आणि जळगाव यांसारख्या मोठ्या शहरांमध्येही त्यांनी महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रत्येकी १ सभा घेऊन जोरदार प्रचार केला. केवळ भाषणांवर न थांबता त्यांनी अनेक शहरांमध्ये भव्य रोड शो केले, ज्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.

यावेळच्या प्रचाराचे आणखी एक वेगळेपण म्हणजे मुख्यमंत्र्यांनी एकूण ३३ माध्यमांना मुलाखती दिल्या, तसेच मराठी सिनेसृष्टीतील नामवंत कलाकारांशी एकूण ६ विशेष चर्चा केल्या.

आता १५ जानेवारी रोजी प्रत्यक्ष मतदान होणार असून या झंझावाती दौऱ्याचा भाजप आणि महायुतीला किती फायदा होतो, हे लवकरच स्पष्ट होईल.

## मतदानाला जाताना वोटर आयडी नसेल तर?




**पुणे, ता. १४ :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीसाठी उद्या म्हणजेच १५ जानेवारी रोजी मतदान पार पडणार आहे. लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होण्यासाठी प्रशासनाकडून सर्व तयारी पूर्ण झाली असून, मतदारांनी मोठ्या संख्येने बाहेर पडून आपला हक्क बजावावा असे आवाहन करण्यात आले आहे. पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी मंगळवारी संध्याकाळी ५ वाजता कूलिंग ऑफ कालावधी सुरू झाला आहे. त्यामुळे प्रचार थांबला असून पुणेकर आता कोणाला मतदान करायचे याचा अंतिम निर्णय घेत आहेत. दरम्यान, मतदानाच्या दिवशी मतदारांनी वैध ओळखपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

सर्वसाधारणपणे मतदानासाठी मतदार ओळखपत्र अनिवार्य आहे, असा अनेकांचा समज आहे. मात्र हा समज पूर्णपणे योग्य नाही. ज्या मतदारांची नावे मतदार यादीत आहेत, अशा मतदारांना मतदार ओळखपत्र नसले तरी निवडणूक आयोगाने मान्य केलेल्या पर्यायी ओळखपत्रांच्या आधारे मतदान करता येणार आहे. त्यामुळे मतदारांनी ओळखपत्र नसल्यामुळे मतदानापासून वंचित राहण्याची गरज नाही.

जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार, मतदान सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार आहे. मतदारांनी आपले नियुक्त मतदान केंद्र गाठून या वेळेत मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने मतदानासाठी एकूण १२ प्रकारच्या पर्यायी ओळखपत्रांना मान्यता दिली आहे. मात्र ओळखपत्रावर स्पष्ट दिसणारा फोटो असणे आवश्यक आहे. ओळखपत्र संशयास्पद किंवा अवैध वाटल्यास मतदान केंद्रावरील अध्यक्षीय अधिकारी मतदान नाकारू शकतात.

मतदानासाठी खालील ओळखपत्रे स्वीकारली जातात: पासपोर्ट, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य सरकार किंवा केंद्र सरकारने दिलेले फोटो असलेले ओळखपत्र, फोटो असलेले बँक किंवा पोस्ट ऑफिस पासबुक, फोटो असलेले अपंगत्व प्रमाणपत्र, मनरेगा जॉब कार्ड, पेन्शनविषयक कागदपत्रे, लोकसभा किंवा विधानसभा ओळखपत्र, स्वातंत्र्यसैनिक ओळखपत्र आणि कामगार मंत्रालयाचे ओळखपत्र.

निवडणूक शांततेत आणि सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासन सज्ज असून मतदारांनी निर्भयपणे मतदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सत्ताधाऱ्यांना जिंकवण्यासाठीच निवडणूक आयोग करतंय मदत?



**मुंबई, ता. १४ :** महापालिका निवडणुकीच्या मतदानाला अवघे २४ तास शिल्लक असताना राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर सडकून टीका केली आहे. निवडणूक आयोग सध्याच्या सरकारला विजय मिळवून देण्यासाठी काम करत असल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी केला. मकरसंक्रांतीच्या दिवशी ठाकरे कुटुंबीय एकत्र आले असताना, राज ठाकरेंनी कार्यकर्त्यांना सतर्क राहण्याचा इशारा दिला.

प्रचाराची मुदत संपल्यानंतरही मतदारांच्या भेटीगाठी घेण्याबाबत आयोगाने जो नवा नियम आणला आहे, त्याला राज ठाकरे यांनी विरोध दर्शवला आहे. मतदानाच्या आदल्या दिवशी ५ वाजेपर्यंत मतदारांना भेटता येईल, पण प्रचार पत्रके वाटता येणार नाहीत, म्हणजे पैसे वाटप करता येतील का? असा प्रश्न त्यांनी विचारला. इतर निवडणुकांमध्ये असा प्रकार कधीच घडला नाही, मग याच वेळी नियम का बदलले, असे त्यांनी विचारले.

सर्वात मोठा संशय त्यांनी 'पाडू' (झऊग) नावाच्या यंत्रणेबाबत व्यक्त केला आहे. मतमोजणीत तांत्रिक अडचण आल्यास हे मशीन वापरले जाणार असल्याचे समजते, मात्र हे यंत्र नेमके काय आहे आणि ते कसे काम करते, हे कोणत्याही पक्षाला सांगण्यात आलेले नाही.

राज ठाकरे यांनी मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या शिवसैनिकांना मतदान केंद्रांवर डोळ्यांत तेल घालून पाळत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. प्रशासकीय पातळीवर होत असलेल्या या हालचाली लोकशाहीसाठी घातक असल्याचे त्यांनी म्हंटले आहे.

### दत्तात्रय काळभोर यांचे निधन



**लोणी काळभोर, ता. १४ :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथील प्रगतशील शेतकरी दत्तात्रय एकनाथ काळभोर (वय -७३) यांचे अल्पशा आजाराने बुधवारी (ता. १४) निधन झाले. त्यांच्या निधनाने लोणी काळभोर सह परिसरात शोककळा परसली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, एक मुलगा, तीन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दत्तात्रय काळभोर यांच्या पार्थिवावर बुधवारी लोणी काळभोर येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष कमलेश काळभोर यांचे ते वडील तर साधना सहकारी बँकेचे जेष्ठ संचालक सुभाष आप्पा काळभोर यांचे ते चुलतभाऊ होत.

## मालेगावमध्ये महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारावर जीवघेणा हल्ला



**मालेगाव, ता. १४ :** नाशिक जिल्ह्यातील मालेगावमध्ये महापालिका निवडणुकीच्या मतदानाला अवघे काही तास शिल्लक असताना एक खळबळजनक घटना घडली आहे. मतदानाच्या अवघ्या काही तास आधी एमआयएमच्या उमेदवारावर हल्ला झाल्याने शहरातील राजकीय वातावरण तापले असून निवडणूक प्रक्रियेच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

मालेगाव शहरातील प्रभाग क्रमांक ४ मधून एमआयएमकडून निवडणूक लढवणारे उमेदवार विशाल आहिरे यांच्यावर रात्री उशिरा अज्ञात व्यक्तींनी हल्ला केला. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या हल्ल्यात त्यांच्या वाहनाच्या काचा फोडण्यात आल्या. सुदैवाने या घटनेत विशाल आहिरे यांना कोणतीही इजा झाली नाही. मात्र या प्रकारामुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विशाल आहिरे हे आपल्या पोलिंग एजंट्सची बैठक आटोपून घरी परतत होते. त्याच वेळी मुंबई आग्रा महामार्गावर दुचाकीवरून आलेल्या अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या वाहनाला अडवण्याचा प्रयत्न केला. काही क्षणातच हल्लेखोरांनी दगडफेक करत वाहनाच्या काचा फोडल्या. हल्लेखोरांनी थेट उमेदवारावर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात येत आहे. या अचानक घडलेल्या प्रकारामुळे परिस्थिती गंभीर बनली होती. मात्र प्रसंगावधान राखत विशाल आहिरे यांनी आपले वाहन वेगाने सायनेगावच्या दिशेने वळवले आणि घटनास्थळावरून निघून गेले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला आणि त्यांचा जीव वाचला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली असून परिसरात तपास सुरू करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. शहरात कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. या प्रकरणी अज्ञात हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने पोलिसांकडून तपास केला जात आहे.

मतदानाला अवघ्ये काही तास उरले असताना कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी प्रशासनाने नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.

# काळेपडळ येथे खून करणाऱ्या चार नायजेरियन आरोपींना अटक

अमित मुंडीक



पुणे, ता. १४ : काळेपडळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत नायजेरियन नागरिक येमेका क्रिस्टीएन (वय ३८, रा. पिसोळी) याला मारहाण झाल्याची घटना घडली होती. ही घटना १२ जानेवारी २०२६ रोजी सकाळच्या सुमारास घडली. गंभीर जखमी अवस्थेत त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी तपास करत असताना मित्रांमधील वादातून खून झाल्याचे निष्पन्न झाले असून, चार नायजेरियन मित्रांचा या गुन्ह्यात सहभाग असल्याचे उघडकीस आले आहे.

घटनेनंतर आरोपी परदेशात पसार होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने तीन स्वतंत्र पथके तयार केली. सीसीटीव्ही फुटेज तसेच गुप्त माहितीच्या आधारे येवलेवाडी, पिसोळी आणि कॅम्प परिसरात छापे टाकण्यात आले. या कारवाईत अवघ्या चार तासांत तीन नायजेरियन आरोपींना ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये जॉनपॉल ओबिन्ना मोनेके (ओबी), ओजॅग्वा आणि नायेमेका मादूबुची ओनिया यांचा समावेश आहे. पोलिस चौकशीत आरोपींनी प्रेमप्रकरणातील वादातून येमेका क्रिस्टीएन याचा खून केल्याची कबुली दिली आहे. चौथा आरोपी अद्याप फरार असून, त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही धडाकेबाज कारवाई परिमंडळ-६चेउपायुक्त (डीसीपी) डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक पोलीस आयुक्त अतुल नवगिरे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनसिंग पाटील यांच्या सूचनेनुसार, सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास सुतार यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

# जामडी तांडा येथे माजी सरपंचाच्या मुलाची तीक्ष्ण हत्याराने हत्या

**छत्रपती संभाजीनगर, ता. १४ :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील जामडी तांडा येथे एका तरुण शेतकऱ्याची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मृत तरुण हा माजी सरपंचांचा मुलगा असून तो सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या ओळखल्या जाणाऱ्या कुटुंबातील होता. त्याचा मृतदेह शेतालगत असलेल्या वनविभागाच्या हद्दीत रक्ताच्या थारोळ्यात आढळून आल्याने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. घटनेनंतर गावात तणावाचं वातावरण आहे.



मृत तरुणाचे नाव राजू रामचंद्र पवार (वय ४५) असे आहे. ते जामडी तांडा येथील माजी सरपंच रामचंद्र पवार यांचे पुत्र होते. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी सुमारे ८ वाजता राजू पवार हे नेहमीप्रमाणे शेतात फेरफटका मारण्यासाठी घराबाहेर पडले होते. साधारणपणे ते ९ वाजेपर्यंत घरी परतत असत. मात्र बराच वेळ झाला तरी ते परतले नाहीत आणि त्यांचा फोनही लागत नसल्याने कुटुंबीयांनी शोध सुरू केला.

ग्रामस्थांच्या मदतीने सुमारे साडेचार तास शोधमोहीम राबवण्यात आली. अखेर शेतापासून सुमारे ५०० मीटर अंतरावर असलेल्या वनविभागाच्या गट क्रमांक ९५ मधील ओढ्यात राजू पवार यांचा मृतदेह आढळून आला. मृतदेह पाहताच हत्या झाल्याचं स्पष्ट झालं. त्यांच्या डोक्यावर आणि कमरेखालच्या भागावर धारदार शस्त्राने गंभीर वार करण्यात आले होते.

घटनास्थळी त्यांचा फुटलेला मोबाईल, चप्पल आणि कपडे विखुरलेल्या अवस्थेत आढळून आले. यावरून त्यांच्याशी झटापट झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. राजू पवार हे सध्या सरपंच असलेल्या त्यांच्या काकूरेणुका पवार यांच्या शासकीय कामकाजात मदत करत होते. त्यामुळे ही हत्या जुन्या राजकीय वादातून झाली की अन्य कोणत्या कारणामुळे, याचा पोलीस तपास करत आहेत. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री, सहाय्यक निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. आरोपींचा शोध सुरू असून, संभाव्य तणाव लक्षात घेता गावात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

# रवींद्र धंगेकरांनी भाजप उमेदवाराच्या पतीचा डान्सबारमधील व्हिडीओ केला शेअर

**पुणे, ता. १४ :** पुणे शहरामध्ये सध्या महापालिका निवडणुकांचे वारे वेगाने वाहू लागले आहेत. पुणे महानगरपालिकेची ही निवडणूक राज्याच्या राजकारणात अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. राज्यात सध्या सत्तेत असलेले तिन्ही प्रमुख पक्ष या निवडणुकीच्या मैदानात आमनेसामने उभे ठाकल्याचे पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे अनेक वेळा चर्चेच्या फेऱ्या आणि बैठका होऊनही या तिन्ही पक्षांमध्ये एकत्रित निवडणूक लढवण्याबाबत कोणतेही ठोस एकमत होऊ शकले नाही.

अशा या राजकीय धामधुमीत शिवसेनेचे नेते रवींद्र धंगेकर यांनी सोशल मीडियावर एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओमुळे पुण्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ



उडाली आहे. धंगेकर यांनी या माध्यमातून विरोधकांवर निशाणा साधला असून निवडणूक निकालाआधीच वातावरण तापले आहे. या व्हिडिओत भाजपच्या एका महिला उमेदवाराचे पती बारमध्ये डान्स करत असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

व्हिडीओसोबत त्यांनी गंभीर आरोप करत शिवाजीनगर मतदारसंघाच्या आमदारांचे सर्व आर्थिक व्यवहार हे संबंधित व्यक्ती सांभाळत असल्याचा दावा केला आहे. तसेच त्यांनी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ आणि आमदार चंद्रकांत पाटील यांच्यावरही टीका केली आहे. याशिवाय आमदार सिद्धार्थ शिरोळे यांचे नाव न घेता, डान्सबारमध्ये नाचणाऱ्या व्यक्तीसोबतचा एक फोटोही त्यांनी शेअर केला आहे. या प्रकरणावर बोलताना रवींद्र धंगेकर यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली. उमेदवारी देताना चारित्र्याचा विचार केला जात नसल्याचा आरोप त्यांनी केला. प्रचाराची जबाबदारी सांभाळणारे लोक जर महापालिकेच्या टेंडरमधून मिळालेला पैसा डान्सबारमध्ये खर्च करत असतील, तर अशा उमेदवारांकडून काय अपेक्षा ठेवायची, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. प्रभाग क्रमांक १२ मधील भाजपच्या एका महिला उमेदवाराच्या पतीचा असाच व्हिडीओ व्हायरल झाल्याचेही त्यांनी सांगितले.

या आर्थिक व्यवहारातून मिळालेल्यापैशांचावापरबारबाळांसाठी केला जात असल्याचा आरोप करत, संस्कृतीच्या गोष्टी करणाऱ्या नेत्यांनी याबाबत खुलासा करावा, अशी मागणी धंगेकर यांनी केली. हा भाजपचा कारभार असल्याची टीका करत त्यांनी ही पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे. या आरोपांमुळे पुणे महापालिका निवडणुकीतील राजकीय वातावरण अधिक तापले आहे.

# हिरापूर अपघातात तीन जणांचा मृत्यू

**जळगाव,ता. १४ :** जळगाव जिल्ह्यातील हिरापूर (ता. चाळीसगाव) येथे सोमवारी रात्री एक भीषण अपघात झाला. चाळीसगाव-नांदगाव रस्त्यावर नूरानी मशीदजवळ दुचाकीला भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीचा अक्षरशः चुराडा झाला आणि तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातात सागर संजय वराडे (वय २७), सोमनाथ संजय वराडे (वय ३२) आणि अक्षय बापू पाटील (वय ३०) यांचा मृत्यू झाला. सागर आणि सोमनाथ हे सख्खे भाऊ होते, तर अक्षय त्यांचा मित्र होता. तिघेही सोमवारी रात्री सुमारे १० वाजेच्या सुमारास तळेगावहून दुचाकीवरून हिरापूरकडे येत होते. नूरानी मशीद परिसरात समोरून येणाऱ्या आयशर कंपनीच्या ट्रकने त्यांच्या दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली.



धडक इतकी जबरदस्त होती की तिघेही तरुण रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात कोसळले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी घटनास्थळी गर्दी केली. काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. चाळीसगाव ग्रामीण पोलिसांनी तातडीने घटनास्थळी येऊन परिस्थिती नियंत्रणात आणली व पंचनामा केला. मृतदेह रात्री उशिरा ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले.

अपघातानंतर ट्रकचालक वाहन घटनास्थळी सोडून फरार झाला आहे. पोलिसांनी ट्रक जप्त केला असून चालकाचा शोध सुरू आहे. एकाच गावातील तीन तरुणांचा असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

या रस्त्यावर वारंवार अपघात होत असल्याने संतप्त ग्रामस्थांनी मंगळवारी दुपारी रस्ता रोको आंदोलन केले. सुमारे दोन तास हे आंदोलन सुरू होते. अखेर प्रशासनाने तात्काळ दखल घेत रस्त्यावर गतिरोधक बसवण्याचे काम सुरू केले, त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

या अपघातात दोन सख्खे भाऊ आणि त्यांच्या मित्राचा मृत्यू झाल्याने हिरापूर गावावर शोककळा पसरली आहे. एकाच वेळी गावातून तीन अंत्ययात्रा निघाल्या. दुपारी एक वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले असून अंत्यविधीला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# पुण्यात दहशत माजवणाऱ्या टोळीला पोलिसांनी शिकवला धडा

**पुणे, ता. १४ :** पुण्यात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत असताना, कोंढवा परिसरातून धक्कादायक घटना समोर येत आहे. कोंढवा परिसरात आम्ही इथले दादा आहोत असे म्हणत नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीवर कोंढवा पोलिसांनी कारवाई केली आहे. परिसरात खून करण्याच्या धमक्या देत उच्छाद मांडणाऱ्या दोन मुख्य आरोपींना पोलिसांनी अटक केली असून, उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. या कारवाईमुळे नागरिकांमध्ये दिलासा व्यक्त केला जात आहे.



ही घटना गेल्या महिन्यात २६ डिसेंबर रोजी कोंढवा परिसरात घडली होती. सोहेल नवाज शेख उर्फ पठाण (वय २५) आणि सादिक शेख हे १० ते १२ साथीदारांसह दुचाकींवरून परिसरात आले होते. या टोळक्याने हातात धारदार शस्त्रे घेत रस्त्यावर दहशत माजवण्यास सुरुवात केली. नागरिकांना शिवीगाळ करत आम्ही मकोका मधून बाहेर आलो आहोत आणि इथले दादा आहोत असे सांगून त्यांनी भीतीचे वातावरण निर्माण केले.

या टोळक्याने नागरिकांना धमकावूनच थांबले नाही, तर परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तोडफोड करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. कोणी पोलिसांत तक्रार केली तर जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये प्रचंड भीती पसरली होती. या प्रकरणी पोलीस कर्मचारी सूरज शुक्ला यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेनंतर सर्व आरोपी पसार झाले होते. कोंढवा पोलिसांनी तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने तपास सुरू ठेवला. त्यानुसार सोहेल पठाण आणि सादिक शेख या दोघांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. या टोळीतील इतर १० ते १२ आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र गावडे करत आहेत. पुणे पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, शहरात दहशत माजवणाऱ्या गुन्हेगारांवर कठोर कारवाई केली जाईल आणि अशा प्रकारांना कोणतीही माफी दिली जाणार नाही.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## मसूर डाळ आणि भात खाणे हे आपल्या आरोग्यासाठी का गरजेचे आहे, जाणून घ्या

पुणे, ता. १४ : आपल्या प्रत्येकाच्या घरामध्ये डाळ भात हा पदार्थ केला जातो. डाळ भात केवळ आपल्या जिभेचे चोचले पुरवत नाही तर, आपल्या आरोग्यासाठी देखील डाळ भात हा फार महत्त्वाचा मानला जातो. डाळ भात केवळ स्वादिष्टच नाही तर, पोषक तत्वांनी समृद्ध असतो. डाळ भाताचा आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर म
ानला जातो. डाळ आणि भात आपल्या शरीरासाठी अत्यंत फायदेशीर आहेत आणि आपल्याला आपली दैनंदिन कामे करण्याची शक्ती प्रदान करतात. मसूर डाळ आणि भात हे आपल्या शरीरासाठी सुपरफुड म्हणून काम करतात.

मसूर डाळ आणि भात हे असे अन्न आहे जे शाकाहारी लोकांसाठी अत्यंत फायदेशीर आहे. मसूर डाळ भात खाल्ल्यास, त्यातील अमीनो आम्ल एकमेकांच्या कमतरतेची पूर्तता करतात, जे आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे.

मसूर डाळ आणि भात एकत्र खाल्ल्याने आपल्या शरीरात साखर आणि उर्जेची पातळी राखली जाते. यामुळे अनेक रोग टाळण्यास मदत होते. तसेच मसूर प्रथिने आणि पोषक तत्वांनी समृद्ध असतात, जे चांगले आरोग्य राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. मसूर डाळ आणि भात एकत्र खाल्ल्यास, मसूरमधील पोषक तत्वे, जसे की फायबर, प्रथिने आणि चांगले चरबी, शरीरात कार्बोहायड्रेट पचन दर नियंत्रित करतात. आपल्याला हे कार्बोहायड्रेट भातामधून मिळतात. मसूर कार्बोहायड्रेट शोषणाचे नियंत्रण शरीरात ग्लुकोज शोषण कमी करते, ज्यामुळे रक्तातील साखरेच्या पातळीत अचानक वाढ किंवा घट होण्यास प्रतिबंध होतो.

वाढत्या वजनाने त्रस्त असाल तर, आहारामध्ये मसूरची डाळ आणि भाताचा समावेश करावा. मसूर डाळीमध्ये प्रथिने आणि फायबर भरपूर प्रमाणात असतात, जे तुम्हाला पोट भरण्यास आणि जास्त काळ पोट भरण्यास मदत करतात.

दरम्यान, मसूर डाळ आणि भात पचवण्यासाठी आपल्या अवयवांना जास्त प्रयत्न करावे लागत नाहीत; उलट, ते आपले पचन सुधारतात. डाळींमध्ये भरपूर फायबर असते, जे पचन सुधारण्यास मदत करते आणि भात देखील आपल्या शरीरात सहज पचतो. यामुळे अपचनासारख्या समस्या टाळता येतात.

# अजित पवारांचा भाजपवर पलटवार; १०० कोटींच्या 'पार्टी फंडा'चा केला खुलासा



**पुणे, ता. १४ :** राज्यातील महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील सत्ताधारी पक्ष भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस आमने-सामने आले असून पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांच्या प्रचारादरम्यान अजित पवार आणि भाजप नेत्यांम ध्ये चांगलीच खडाजंगी रंगली आहे. अजित पवारांनी थेट भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप केल्यानंतर भाजपच्या मंत्र्यांनीही त्यांना लक्ष्य केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अजित पवारांना आधी टोला लगावला आणि नंतर थेट टीका केली.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अजित पवारांवरील ७० हजार कोटी रुपयांच्या कथित सिंचन घोटाळ्याचा खटला अद्याप न्यायालयात सुरू असल्याचे सांगत अप्रत्यक्ष इशाराच दिला होता. त्यावर प्रत्युत्तर देताना अजित पवारांनी पुणे जिल्ह्यातील पुरंदर उपसा सिंचन योजनेतील कथित घोटाळ्याचा किस्सा उघड केला आहे. ही फाईल मी बाहेर काढली असती तर मोठा हाहाकार माजला असता, असेही त्यांनी म्हटले आहे.

अजित पवारांनी २५ वर्षांपूर्वीच्या एका प्रकरणाचा संदर्भ देत भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले की, १९९९ साली काँग्रेस-राष्ट्रवादी सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांच्याकडे जलसंपदा खाते आले होते. त्या वेळी पुणे जिल्ह्यातील पुरंदर उपसा सिंचन योजनेची फाईल त्यांच्या टेबलावर आली होती. या फाईलम ध्ये या प्रकल्पाची किंमत ३१० कोटी रुपये दाखवण्यात आली होती. मात्र चौकशी केली असता अधिकाऱ्यांनी सांगितले की, आधीच्या सरकारने ही किंमत वाढवली होती.

त्या वेळी राज्यात १९९५ ते १९९९ दरम्यान शिवसेना-भाजप युतीचे सरकार होते. अजित पवारांच्या म्हणण्यानुसार, एका अधिकाऱ्याने त्यांच्या समोर कबुली दिली की या प्रकल्पाची खरी किंमत २०० कोटी रुपये होती. मात्र १०० कोटी रुपये पार्टी फंडासाठी मागण्यात आले होते. त्यामुळे अधिकाऱ्यांनी स्वतःचे १० कोटी रुपये त्यात वाढवले आणि प्रकल्पाची किंमत ३१० कोटी रुपये करण्यात आली.

अजित पवार म्हणाले की, ही फाईल आजही माझ्याकडे आहे. मी ती फाईल बाहेर काढली असती तर मोठा हाहाकार माजला असता. प्रचारादरम्यान त्यांनी केलेल्या या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे १९९९ मधील युती सरकारमध्ये भाजपचे दिवंगत नेते महादेवराव शिवणकर हे जलसंपदा मंत्री होते. त्यामुळे या प्रकरणावर भाजपकडून काय प्रतिक्रिया येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


## नातेवाईकांनी अंत्यविधीची तयारी सुरु केली अन् आजी झाली जिवंत

**नागपूर, ता. १४ :** नागपूर येथील रामटेक जवळील चारगाव येथे एका वृद्ध महिलेने चक्क मृत्यूलाच हुलकावणी दिल्याचा अजब प्रकार घडला आहे. १०३ वर्षांच्या गंगाबाई साखरे यांचा सोमवारी श्वास थांबल्याने त्या हे जग सोडून गेल्याचे सर्वांना वाटले होते.

त्या मागील २ वर्षांपासून आजारपणामुळे अंथरुणाला खिळल्या होत्या. दरम्यान, त्यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक एकत्र झाले आणि गावात शोकाकुल वातावरण पसरले. अंत्यविधीची सर्व तयारी पूर्ण करण्यात आली होती. थोड्याच वेळात अंत्यविधीसाठी नेले जाणार होते.

मात्र, गंगाबाईंच्या पायाचे बोट हलत असल्याचे एका नातेवाईकाला दिसून आले. थोड्याच वेळात आजींनी डोळे उघडले आणि त्या पुन्हा श्वास घेऊ लागल्या. हे पाहताच तिथे हजर असलेले लोक चकित झाले.

# पूजा खेडकर यांच्या बंगल्यावर धाडसी दरोडा; एका आरोपीला अटक



**पुणे, ता. १४ :** बडतर्फ आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या पुण्यातील बंगल्यावर झालेल्या दरोड्याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांनी मोठी कारवाई करत म ुंब्र्यातून एका संशयिताला अटक केली आहे. खुम्मा दिलबहादूर शाही (वय ४०, रा. कौशल, मुंब्रा, जि. ठाणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तो पूजा खेडकर यांच्या बंगल्यावर नुकताच कामाला ठेवण्यात आलेल्या हिकमत या नोकराचा वडील असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

नॅशनल हौसिंग सोसायटीतील पूजा खेडकर यांच्या बंगल्यात हा धक्कादायक प्रकार सुमारे १० ते १५ दिवसांपूर्वी कामावर लागलेल्या हिकमत यानेच घडवून आणल्याचा संशय पोलिसांना आहे. शनिवारी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास हिकमतने घरातील आई-वडील, रखवालदार, कुक आणि वाहनचालक यांना गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध केले. त्याच वेळी पूजा खेडकर घरी परतल्या. त्यांना पाहताच आरोपीने त्यांचे हातपाय चिकटपट्टीने बांधले आणि घरातील मौल्यवान वस्तू घेऊन पोबारा केला.

घरातील सर्वजण बेशुद्ध असल्यामुळे घटनेचा नेमका क्रम कसा घडला, याची सविस्तर माहिती सुरुवातीला मिळू शकली नव्हती. म ात्र, सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर पोलिसांना एकूण ७ संशयित आरोपी दिसून आले असून तपासाला वेग देण्यात आला आहे. पोलिस उपायुक्त रजनीकांत चिलुमुला आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक उत्तम भजनावळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक अनिकेत पोटे यांच्या पथकाने तपास सुरू केला. तपासादरम्यान हिकमतचा शोध घेत असताना त्याचे वडील खुम्मा शाही हे मुंब्र्यात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर सोमवारी रात्री उशिरा पोलिसांनी त्यांना अटक केली.

खुम्मा शाही यांची सध्या चौकशी सुरू असून या दरोड्यामागे कोण आहे, चोरीचा माल कुठे गेला आणि इतर आरोपींची भूमिका काय आहे, याचा शोध घेतला जात आहे. या प्रकरणामुळे शहरात खळबळ उडाली असून घरगुती नोकरांच्या पार्श्वभूमी तपासणीचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## मावळ येथील फाले कुटुंबाच्या मारेकऱ्यांना मरेपर्यंत कोठडी

**पुणे, ता. १४ :** पुणे जिल्ह्यातील म ावळ तालुक्यातील धामणे येथे घडलेल्या बहुचर्चित आणि अत्यंत संवेदनशील फाले कुटुंब तिहेरी हत्याकांडाचा निकाल तब्बल ८ वर्षांनंतर लागला आहे. सशस्त्र दरोडा टाकून एकाच घरातील आई, वडील आणि तरुण मुलाची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी १० अट्टल गुन्हेगारांना वडगाव मावळ सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

या निकालामुळे संपूर्ण मावळ परिसरात मोठी चर्चा सुरू असून पीडित कुटुंबाला उशिरा का होईना पण न्याय मि ळाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. ही घटना सन २०१७ मध्ये मावळ तालुक्यातील धामणे गावात घडली होती. नथू विठोबा फाले हे पत्नी छबाबाई फाले आणि मुलगा अभिनंदन फाले यांच्यासह शेतातील कामे उरकून रात्री घरात झोपले होते. त्याच वेळी दरोडेखोरांच्या टोळीने त्यांच्या घरावर सशस्त्र हल्ला केला. दरोड्याला विरोध केल्यामुळे आरोपींनी तिघांचीही निर्दय हत्या केली होती. तांत्रिक पुरावे, घटनास्थळावरील माहिती आणि प्रत्यक्षदर्शींच्या साक्षी यांच्या आधारे पोलिसांनी आरोपींविरोधात मजबूत दोषारोपपत्र दाखल केले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात आला. वडगाव मावळ जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश डी. के. अनभुले यांनी प्रकरणातील गंभीरता लक्षात घेऊन सर्व १० आरोपींना दोषी ठरवले. नागेश उर्फ नाग्या भोसले, छोट्या उर्फ बापू काळे, बाब्या उर्फ भेन्या चव्हाण, सेवन उर्फ डेंग्या लाभ, दिलीप चव्हाण, सुपार उर्फ सुपर्या चव्हाण, राजू शिंगाड, अजय पवार, योगेश भोसले आणि दीपक भोसले या आरोपींना एकत्रितपणे जन्म ठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.

## मोहोळ परिसरात गोवंशाची बेकायदेशीर तस्करी करणाऱ्या एका टोळीला अटक




**सोलापूर, ता. १४ :** सोलापूरच्या ग्रामीण पोलीस दलाने मोहोळ परिसरात गोवंशाची बेकायदेशीर तस्करी करणाऱ्या एका टोळीचा पर्दाफाश केला असून सात जणांना ताब्यात घेतले आहे. ही टोळी संघटितपणे गुन्हे करत असल्याने पोलिसांनी त्यांच्यावर कायद्याचे अतिशय कडक कलम लावले आहे. गुन्हेगारी जगतात या टोळीचा मोठा वावर असून त्यांच्या विरोधात याआधीच २६ वेगवेगळ्या गुन्ह्यांची नोंद झालेली आहे. भारतीय न्याय संहिता अंतर्गत २०२३ चे कलम १११ (२)(ब), (३), (४) म्हणजेच संघटित गुन्हेगारीचे कलम वाढवून कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाईचे मुख्य कारण म्हणजे ५ जुलै २०२५ रोजी घडलेली एक घटना आहे. नरखेड येथे राहणाऱ्या एका व्यक्तीने पोलिसांना गुन्हेगारी कृत्यांची टीप दिली, असा संशय या टोळीला होता. त्यावरून या सात जणांनी त्या नागरिकाचा रस्ता अडवून त्याला संपवून टाकण्याची भीती घातली होती. या धमकीनंतर पीडित व्यक्तीने पोलिसांकडे धाव घेतली आणि तक्रार नोंदवली. तपासादरम्यान पोलीस अधिकारी हेमंत शेडगे यांना असे समजले की, ही टोळी केवळ तस्करी करत नसून लोकांमध्ये आपली दहशत निर्माण करण्यासाठी शस्त्रांचा धाक देखील दाखवत असे.

वारंवार गुन्हे करूनही ही टोळी ऐकत नसल्याने पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या नियमांनुसार त्यांच्यावर कारवाई केली आहे. या मोहिमेत पोलिसांनी तौफिक कुरेशी ३२, दानिश कुरेशी २५, शहाबाज कुरेशी २७, महमदअली कुरेशी २४, इरफान कुरेशी २७, दस्तगीर कुरेशी २५ आणि अरबाज कुरेशी २५ या तरुणांना जेरबंद केले आहे. हे सर्व आरोपी मोहोळ येथील कुरेशी गल्लीचे निवासी आहेत.

## येरवडा शास्त्रीनगर चौकात खासगी बसच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू




**पुणे, ता. १४ :** प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बसच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना येरवड्यातील शास्त्रीनगर चौकात घडली. अपघातात दुचाकीवरील सहप्रवासी तरुण जखमी झाला. या प्रकरणी लक्ष्मीनगर पोलिसांनी बस चालकाला अटक केली.

हर्ष लाड असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. अपघातात करण अमित जाधव (वय-२१, रा. कल्पतरु सोसायटी, बोरीवली, मुंबई) जखमी झाला. या प्रकरणी प्रवासी वाहतूक करणारा बस चालक जयवंत हरिभाऊ बोरेकर (वय-४६, रा. खडकी बुद्रुक, ता.मंगळूरपीर, जि. अकोला) याला अटक करण्यात आली. याबाबत करण जाधव याने लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ जानेवारी रोजी सकाळी पावणेनऊच्या सुमारास हर्ष लाड आणि त्याचा मित्र करण जाधव हे दुचाकीवरुन नगर रस्त्यावरुन निघाले होते. येरवड्यातील शास्त्रीनगर चौकातील सिग्नलला ते थांबले होते. त्या वेळी पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या प्रवासी बसने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. अपघातात हर्ष आणि त्याचा मित्र करण हे जखमी झाले. गंभीर जखमी झालेल्या हर्ष आणि करण यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच हर्ष याचा मृत्यू झाला होता. अपघातानंतर बस चालक बोरेकर याला अटक करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक विभुते तपास करत आहेत.

दरम्यान, येरवड्यातील शास्त्रीनगर चौकात यापूर्वी गंभीर स्वरुपाचे अपघात झाले आहेत. नगर रस्त्यावरील वाहने शास्त्रीनगर चौकातून ये-जा करतात. अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी प्रवासी वाहने या चौकातून जातात. भरधाव प्रवासी वाहने, तसेच डंपर, सिमेंट मिक्सर चालकांच्या बेदकारपणुळे या भागात गंभीर अपघात घडतात.

## पुण्यात ज्येष्ठ नागरिकाची सायबर चोरट्याकडून २ लाखांची फसवणूक




**पिंपरी-चिंचवड, ता. १४ :** दिवसेंदिवस सायबर गुन्हेगारी वाढत असताना अशातच, पिंपरी-चिंचवड परिसरातून सायबर फसवणुकीचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बनावट कस्टमर केअरच्या माध्यमातून एका ज्येष्ठ नागरिकाची १ लाख ९९ हजार ५०० रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे. गुगलवर दिसलेल्या टोल फ्री क्रमांकावर विश्वास ठेवल्यामुळे रत्नाकर देवेंद्र नाशिककर (वय ६४) यांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागला आहे.

नाशिककर यांना त्यांच्या कुटुंबातील बँक ऑफ बडोदा खात्याशी संबंधित डेथ क्लेम बाबत काही माहिती घ्यायची होती. यासाठी त्यांनी गुगलवर बँकेचा कस्टमर केअर क्रमांक शोधला. याचदरम्यान त्यांना सायबर भामट्यांनी दिलेला बनावट क्रमांक मिळाला. या क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर समोरून बोलणाऱ्या व्यक्तीने आपण बँकेचा कर्मचारी असल्याचे भासवले आणि त्यांचा विश्वास संपादन केला.

**व्हॉट्सअॅपवर पाठवली फाईल**

संशयित व्यक्तीने क्लेमची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नाशिककर यांना व्हॉट्सपवर एक एपीके फाईल पाठवली. ही फाईल डाऊनलोड करून आवश्यक माहिती भरण्यास सांगण्यात आले. नाशिककर यांनी ती फाईल मोबाईलमध्ये डाऊनलोड केल्यानंतर काही वेळातच त्यांच्या मोबाईलचा ताबा आरोपींकडे गेला. त्यानंतर त्यांच्या बँक खात्यातून १ लाख ९९ हजार ५०० रुपये अज्ञात खात्यावर वळवण्यात आले.

**पोलीस ठाण्यात धाव**

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच नाशिककर यांनी तत्काळ रावेत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणी तीन वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकधारकांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. सायबर पोलीस या क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण करून आरोपींचा शोध घेत आहेत.

## सासरच्या संपत्तीवर आता सुनेचा अधिकार? सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय



**नवी दिल्ली, ता. १४ :** सर्वोच्च न्यायालयाने विधवांच्या हिताचा एक मोठा निर्णय दिला असून सासरच्या संपत्तीतून उदरनिर्वाहाचा खर्च मिळवणे हा सुनेचा हक्क असल्याचे मान्य केले आहे. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीला सन्मानाने जगता यावे यासाठी केवळ तांत्रिक बाबींमुळे तिला तिचा हक्क न देणे हे योग्य नाही, असे न्याय मूर्तींनी स्पष्ट केले. हिंदू दत्तक आणि देखभाल कायदा १९५६ च्या आधारे हा निकाल देण्यात आला आहे.

हे प्रकरण गीता शर्मा यांचे असून गीता यांच्या सासऱ्यांचे निधन २०२१ मध्ये झाले आणि त्यानंतर २०२३ मध्ये त्यांच्या पतीचे निधन झाले. सासरा जिवंत असताना पतीचा मृत्यू झाला नाही, या कारणाने सुरुवातीला सुनेची पोटगी नाकारण्यात आली होती. मात्र, उच्च न्यायालयाने दिलेला सुनेच्या बाजूचा निकाल आता सर्वोच्च न्यायालयानेही कायम ठेवला आहे.

न्यायालयाच्या मते, मुलाची विधवा या शब्दाची व्याप्ती मोठी आहे. पती सासू-सासऱ्यांच्या आधी वारला की नंतर, यावरून सुनेचे हक्क हिरावले जाऊ शकत नाहीत. केवळ वेळेच्या मुद्द्यावरून फरक करणे हे राज्यघटनेने दिलेल्या समानतेच्या तत्त्वाच्या विरोधात असल्याचे खंडपीठाने म्हटले आहे. स्वतःचा सांभाळ करू न शकणाऱ्या विधवा महिलेला सासरच्या मालमत्तेतून मदत मिळणे आवश्यक आहे.

निकाल देताना न्यायालयाने जुन्या परंपरेचा दाखला देऊन महिलांच्या संरक्षणाची जबाबदारी कुटुंबावर असल्याचे सांगितले. जर विधवा सुनेला आर्थिक मदत नाकारली, तर तिला समाजात मोठ्या संकटांना सामोरे जावे लागू शकते, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली. या निर्णयामुळे आता पतीच्या निधनानंतर निराधार झालेल्या महिलांना सासरच्या मालमत्तेत हक्क मिळवण्यासाठी कायदेशीर बळ प्राप्त झाले आहे.

# भाजपचा जाहीरनामा नसून नऊ वर्षांतील नाकर्तेपणाचा कबुलीनामा

### खासदार डॉ. अमोल कोल्हे यांची टीका



**पिंपरी, ता. १४ :** श्वान नसबंदीतील भ्रष्टाचार, रस्त्यांच्या कामाच्या वाढीव निविदा, भोसरीतील ७० लाखांचा पादचारी उड्डाणपूल सात कोटींवर कसा गेला, महापालिका कर्जबाजारी कशी झाली, या एकाही प्रश्नांचे उत्तर भाजपने दिले नाही. या प्रश्नांचे उत्तर देण्याऐवजी भाजपचे आमदार आम्ही काय बांगड्या भरल्या आहेत का, असे म्हणत आहेत. भाजपकडे या आरोपांची उत्तर नसल्याने आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या घरावर हल्ले केले जात आहेत. भाजपचा जाहीरनामा नसून नऊ वर्षांतील नाकर्तेपणाचा कबुलीनामा आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रभाग क्रमांक च्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा झाली. या वेळी डॉ. कोल्हे बोलत होते. उमेदवार संदीप वाघेरे, डब्बू आसवानी, प्रियंका कुदळे, निकिता कदम या वेळी उपस्थित होत्या.

डॉ. कोल्हे म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार प्रियंका कुदळे यांच्या घरावर हल्ला करण्यात आला. या हल्ल्याचा त्यांच्या मनावर मोठा परिणाम झाला आहे. त्यांचे मनोधैर्य खच्ची केले जात आहे. कुदळे यांच्या घरावर नव्हे, प्रत्येक महिलेच्या अस्तित्वावर, स्वाभिमानावर हल्ला झाला आहे. पिंपरी गावातील अपप्रवृत्ती ठेचली पाहिजे.

हजारो कोटींच्या ठेवी असलेली महापालिका कर्जबाजारी केली. ६०० कोटी रुपये खर्च करून उभारलेले ७५ टक्के सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. या प्रश्नांचे उत्तर देण्याऐवजी भाजपचे आमदार आम्ही बांगड्या भरल्या आहेत का असे म्हणत आहेत. कुठे तरी पाणी मुरत आहे. शहरातील सांडपाणी प्रकल्पाचे काम आमदाराच्या जवळच्या व्यक्तीच्या कंपनीला दिले आहे. या कंपनीची उलाढाल १३ कोटींवरून १५ हजार कोटींवर पोहोचली आहे.

या कंपनीच्या सांडपाणी प्रकल्पाचे लेखापरीक्षण करावे आणि पारदर्शक कारभार असल्याचे सिद्ध करून दाखवावे. या कंपनीकडून मैलामिश्रित पाणी कोणत्याही प्रक्रियेविना नदीत सोडले जात आहे. आरोप डॉ. कोल्हे यांनी केला. तसेच, शरद पवार आणि अजित पवार यांचे जुळले असून, पिंपरी-चिंचवडचे वारे फिरले असल्याचेही ते म्हणाले.

माजी नगरसेविका रुपाली ठोंबरे म्हणाल्या, आमदार महेश लांडगे यांना अजित पवार यांनी घडविले आहे. लांडगे यांना सन २००४ मध्ये अटक झाली होती. भंगार, मशिनरी चोरल्या. त्यानंतर आमदार झाले. आता पवारांवर एकेरी भाषेत बोलतात. लांडगे हे खोटे हिंदुत्ववादी आहेत. मतासाठी त्यांनी २०१४ मध्ये मुस्लिम बांधवांसोबत बैठका घेतल्या आहेत. पिंपरी गावात दहशत सुरू झाली आहे. उमेदवाराच्या घरावर हल्ले केले जात आहेत.